# २७ रोजी नागपुरात 'टीसीएस आयटी विझ २०१६'

**नागपूर :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस टीसीएस या आयटी क्षेत्रातील अग्रगण्य सल्लागार व व्यवसाय कंपनीतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी 'टीसीएस आयटी विझ २०१६' या भारतातील सर्वात मोठ्या तंत्रज्ञानविषयक प्रश्नमंजुषेचे आयोजन नागपुरात करण्यात येणार आहे. ही स्पर्धा मंगळवार दि. २७ सप्टेंबरला डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह सिव्हिल लाईन येथे होणार आहे. स्पर्धा निःशुल्क राहणार असून इयत्ता ८ व्या वर्गापासून ते १२ वीपर्यंतचे विद्यार्थी स्पर्धेत भाग घेऊ शकतात. प्रत्येक शाळेतून दोन विद्यार्थ्यांची एक टीम अशा कितीही टीम सहभागी होऊ शकतात.

स्पर्धेत सहभागासाठी संबंधित संस्थातर्फे २४ सप्टेंबरपर्यंत प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेश नोंदणीसाठी प्रशांत कोपरकर, टीसीएस आयटी विझ- संयोजक, अग्रवाल हाऊस बुराडे गल्ली, तेलीपुरा सीताबर्डी या पत्त्यावर संपर्क करावा किंवा डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यूडॉट टीसीएसआयटीडब्ल्यूझेडडॉटकॉम या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने देखील नोंदणी करता येईल.

भारतात १५ ठिकाणी टीसीएएस आयटी विझ २०१६ चे आयोजन करण्यात आले आहे. यात अहमदाबाद, बेंगळुर, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली, हैद्राबाद, इंदोर, कोची, कोलकाता, लखनौ, मुंबई, पुणे व विशाखापट्टणम या शहरांचा समावेश आहे.